मुख्य कार्यालय : परळी वैजनाथ
बीड महाराष्ट्र | गुरुवार, 24 सप्टेंबर 2026| | अंक क्र. 133 | वर्षे 4 थे | मुल्य 3 रुपये | पृष्ठे 4
दैनिक
# अतुल्य महाराष्ट्र
बीड, रविवार, 20 सप्टेंबर 2026
Website : atulymaharashtra.com RNI RGN No. MAH/MAR 2023/52446 Email : dailyatulyamaharashtra@gmail.com

# लातूर ग्रामीण मधील दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांना तात्काळ मदत द्यावी

## मुख्यमंत्री महोदयाकडे युवा नेते ऋषिकेश कराड यांची मागणी

**लातूर |** यावर्षी अत्यल्प पाऊस झाल्याने लातूर ग्रामीण विधानसभा मतदार संघातील शेतकरी मोठ्या संकटात सापडला आहे. एकूण परिस्थिती लक्षात घेता मतदार संघात दुष्काळ जाहीर करून शेतकऱ्यांना तातडीने भरीव मदत करावी अशी मागणी राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस यांच्याकडे एका निवेदनाद्वारे भारतीय जनता युवा मोर्चाचे जिल्हाध्यक्ष ऋषिकेशदादा रमेशआप्पा कराड यांनी केली आहे.

लातूर, धाराशिव जिल्ह्यातील पीक परिस्थितीची पाहणी करण्यासाठी मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस हे आज बुधवारी लातूर दौऱ्यावर आले असता लातूर विमानतळावर त्यांची भेट घेऊन युवा नेते ऋषिकेशदादा कराड यांनी लातूर ग्रामीण मतदार संघातील दुष्काळी परिस्थिती, शेतकरी बांधवांच्या अडचणी, पिण्याच्या पाण्याचा प्रश्न तसेच जनावरांच्या चारा-पाण्याची निर्माण झालेली परिस्थिती याबाबत सविस्तर माहिती एका निवेदनाद्वारे दिली.

लातूर ग्रामीणमधील शेतकरी आणि नागरिकांना या कठीण काळात शासनाकडून तातडीने मदत मिळावी, अशी आग्रहाची मागणी ऋषिकेश कराड यांनी केली असता मुख्यमंत्री महोदयांनी सकारात्मक प्रतिसाद देत, येत्या दोन दिवसांत दुष्काळा परिस्थितीबाबत निर्णय घेवून शेतकऱ्यांना सर्व प्रकारची मदत देण्यात येईल, अशी ग्वाही दिली. तसेच रब्बी हंगामात पिके घेण्यासाठी आवश्यक मदत करण्याचा शासनाचा प्रयत्न राहणार असल्याचे त्यांनी बोलून दाखवले.

याप्रसंगी जिल्ह्याचे पालकमंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले, परिवहन मंत्री प्रतापजी सरनाईक, सहकार मंत्री बाबासाहेब पाटील, माजी पालकमंत्री आ. संभाजीराव पाटील निलंगेकर, माजी मंत्री आ. संजय बनसोडे, आ. अभिमन्यू पवार, गोविंदआण्णा केंद्रे, गणेशदादा हाके, लातूर ग्रामीण शेत रस्ता समितीसह अध्यक्ष सुरज शिंदे, लातूर संजय गांधी निराधार योजना समिती अध्यक्ष बन्सी भिसे, रेणापूर पंस उपसभापती शरद दरेकर, लातूर मंडल अध्यक्ष प्रताप पाटील यांच्यासह अनेक जण होते.



# बीड जिल्ह्यातील दुष्काळी परिस्थितीबाबत विधानभवनात आवाज उठवून तातडीने मदत मिळवून द्या - अक्षय भुंबे

## आमदार रोहित पवार यांना रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (सचिन खरात) पक्षाचे निवेदन

**अंबाजोगाई प्रतिनिधी**

बीड जिल्ह्यातील शेतकरी व शेतमजुरांच्या गंभीर दुष्काळी परिस्थितीबाबत विधानभवनात ठोस आवाज उठवून तातडीने मदत मिळवून द्यावी अशी मागणी रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (सचिन खरात) पक्षाचे मराठवाडा विभागीय अध्यक्ष अक्षय भुंबे यांनी राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे युवा नेते आमदार रोहित पवार यांच्याकडे केली आहे. या संदर्भात त्यांनी विविध मागण्यांचे निवेदन दिले आहे.

रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (सचिन खरात) पक्षाचे मराठवाडा विभागीय अध्यक्ष अक्षय भुंबे यांच्या वतीने दिलेल्या निवेदनात नमूद केले आहे की, बीड जिल्ह्यासह अंबाजोगाई तालुक्यात यावर्षी अत्यंत गंभीर दुष्काळी परिस्थिती निर्माण झाली आहे. पावसाच्या अनियमिततेमुळे खरीप पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले असून अनेक शेतकऱ्यांच्या शेतातील पिके डोळ्यांदेखत करपून जात आहेत. शेतकऱ्यांसमोर शेतीचा खर्च, कर्जाचा भार, कुटुंबाचा उदरनिर्वाह आणि पुढील हंगामाचे नियोजन असे अनेक गंभीर प्रश्न उभे आहेत. या परिस्थितीकडे प्रशासनाचे लक्ष वेधण्यासाठी शेतकरी जनआक्रोश मोर्चाच्या माध्यमातून बीड जिल्ह्यात मराठवाड्यातील पहिल्या प्रमुख आंदोलनांपैकी एक आंदोलन आम्ही उभे केले. या आंदोलनाच्या माध्यमातून शेतकरी, शेतमजूर आणि पशुधनाच्या प्रश्नांसाठी प्रशासनाकडे ठोस मागण्या मांडण्यात आल्या. आपण प्रत्यक्ष शेतकऱ्यांच्या बांधावर जाऊन परिस्थितीची पाहणी करून शेतकऱ्यांची व्यथा महाराष्ट्राच्या विधानभवनात ठामपणे मांडावी, ही आमची अपेक्षा आहे. आमच्या प्रमुख मागण्या अशा : १) बीड जिल्ह्यातील दुष्काळी परिस्थितीचा तातडीने गांभीर्याने विचार करून आवश्यक मदत जाहीर करावी., २) नुकसान झालेल्या पिकांचे तातडीने पंचनामे करून शेतकऱ्यांना योग्य व पुरेशी नुकसानभरपाई द्यावी., ३) सरसकट पीक विमा लागू करून पात्र शेतकऱ्यांना पीक विम्याची रक्कम तातडीने मिळवून द्यावी., ४) शेतकऱ्यांना हेक्टरी किमान रूपाने १ लाख आर्थिक मदत देण्यासाठी शासनाकडे पाठपुरावा करावा., ५) जनावरांसाठी तातडीने चारा छावण्या सुरू कराव्यात तसेच पुरेसा चारा व पिण्याच्या पाण्याची व्यवस्था करावी., ६) शेतमजुरांच्या हाताला काम उपलब्ध करून देण्यासाठी रोजगाराच्या विशेष उपाययोजना कराव्यात., ७) पिण्याच्या पाण्याचा प्रश्न गंभीर होण्यापूर्वी टँकर व इतर आवश्यक उपाययोजना तातडीने सुरू कराव्यात., ८) शेतकऱ्यांवरील कर्जाचा ताण लक्षात घेऊन कर्जवसुलीला आवश्यक ती सवलत/स्थगिती देण्यासाठी शासनाकडे पाठपुरावा करावा., ९) बीड जिल्ह्यातील दुष्काळी परिस्थितीचा वस्तुनिष्ठ अहवाल शासनासमोर मांडून विशेष आर्थिक पॅकेज मिळवून देण्यासाठी विधानभवनात आवाज उठवावा. आणि १०) अंबाजोगाई तालुक्यासह बीड जिल्ह्यातील शेतकऱ्यांच्या प्रश्नांवर शासनाकडून ठोस निर्णय होईपर्यंत हा विषय विधानसभेत सातत्याने उपस्थित करावा. निवेदनात या मागण्यांचा समावेश आहे. सदरील निवेदनावर रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (सचिन खरात) पक्षाचे मराठवाडा विभागीय अध्यक्ष अक्षय भुंबे, मराठवाडा सचिव अरूण बनसोडे, तालुकाध्यक्ष बादल तरकसे, महिला जिल्हाध्यक्ष मिनाताई लोंढे, शहराध्यक्ष शेरू पठाण, दादू उपाडे यांच्या स्वाक्षऱ्या आहेत.



### शेतकरी राज्याच्या अर्थव्यवस्थेचा कणा :

**शेतकरी हा केवळ मतदार नाही, तर राज्याच्या अर्थव्यवस्थेचा कणा आहे. आज तो संकटात असताना राजकीय मतभेद बाजूला ठेवून शेतकऱ्यांच्या प्रश्नांसाठी सर्वांनी एकत्र उभे राहणे गरजेचे आहे. आ.रोहितदादा हे स्वतः शेतकऱ्यांच्या बांधावर आले. त्यामुळे या बांधावर दिसणारी परिस्थिती त्यांच्या माध्यमातून विधानभवनात पोहोचावी आणि शेतकऱ्यांच्या आक्रोशाला शासनाच्या निर्णयाची जोड मिळावी, हीच आमची अपेक्षा आहे. शेतकरी जनआक्रोश मोर्चाच्या माध्यमातून आम्ही आंदोलन केले आहे आणि शेतकऱ्यांना न्याय मिळेपर्यंत आमचा हा संघर्ष सुरूच राहील. आपण आमचे निवेदन स्वीकारून वरील मागण्यां महाराष्ट्राच्या विधानभवनात ठामपणे मांडाव्यात व शासनाकडून तातडीने निर्णय घेण्यासाठी पाठपुरावा करावा.**

**- अक्षय भुंबे**

मराठवाडा विभागीय अध्यक्ष रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (खरात गट)

# दुष्काळसदृश परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर प्रशासनाने पीक नुकसानीचे पंचनामे तातडीने पूर्ण करावे

## पिण्याचे पाणी, जलसंधारण, कृषी, आणि वीजपुरवठ्याला प्राधान्य द्या :महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे

**मुंबई :** राज्यातील पावसाने ओढ दिल्यामुळे निर्माण झालेल्या दुष्काळसदृश परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर शेतकरी आणि नागरिकांना तातडीने दिलासा मिळण्यासाठी प्रशासनाने युद्धपातळीवर उपाययोजना हाती घेतल्या आहेत.पिण्याच्या पाण्याची उपलब्धता, जलसंधारण, कृषी, वीजपुरवठ्याशी संबंधित विषयांना सर्वोच्च प्राधान्य द्यावे, असे निर्देश महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी दिले.

राज्यातील दुष्काळ परिस्थिती आणि सेवा संकल्प अभियानाच्या अंमलबजावणीसंदर्भात मंत्रालयात आयोजित बैठकीत महसूल मंत्री श्री. बावनकुळे बोलत होते. मुख्य सचिव राजेश अग्रवाल यांच्यासह विविध विभागांचे वरिष्ठ अधिकारी बैठकीस उपस्थित होते.

महसूलमंत्री मंत्री श्री. बावनकुळे म्हणाले, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे उपमुख्यमंत्री, सुनेत्रा पवार,मंत्री राज्यातील काही भागांचा दौरा करून प्रत्यक्ष परिस्थितीचा आढावा घेत आहेत. या पार्श्वभूमीवर पुढील काही दिवस प्रशासनाने दुष्काळसदृश परिस्थितीतील उपाययोजनांवर विशेष लक्ष केंद्रित करावे, पीक नुकसानीचे पंचनामे पारदर्शकपणे पूर्ण करावे, पावसाच्या खंडामुळे पिकांवर झालेल्या परिणामाचे अचूक



मूल्यांकन करण्यासाठी कृषी सहाय्यक, ग्रामसेवक आणि तलाठी यांनी संयुक्तपणे प्रत्यक्ष पाहणी करून पंचनामे करावे आणि ग्रामसभेत मांडण्यात यावे.तसेच पंचनाम्याची कार्यपद्धती स्पष्ट करणारी एसओपी तातडीने तयार करावे. तसेच डिजिटल क्रॉप सर्वेक्षणाला गती द्यावी. जलसंधारणाच्या कामांना गती देतानाच भूजलपातळी वाढविण्यासाठी पाणी जमिनीत मुरविणाऱ्या उपाययोजनांवर भर द्यावा. उपलब्ध जलस्त्रोतांचे पुनर्भरण करण्यासाठी जिल्हानिहाय नियोजन करावे.

सध्याच्या परिस्थितीत सिमेंट रस्ते आणि इतर नियमित विकासकामांच्या तुलनेत जलसंधारण, पिण्याचे पाणी, कृषी आणि आपत्कालीन स्वरूपाच्या कामांना प्राधान्य द्यावे. अंगणवाडीतील आवश्यक सुविधा व सेवा सुरळीत राहतील याकडे लक्ष द्यावे महावितरणशी संबंधित तक्रारी मोठ्या प्रमाणात प्राप्त होत असल्याने जिल्हाधिकाऱ्यांनी महावितरणच्या अधिकाऱ्यांसोबत तातडीने बैठक घेऊन प्रशासकीय नियंत्रण ठेवावे.असेही मंत्री श्री. बावनकुळे यांनी सांगितले.

- **सेवा संकल्प अभियानातून नागरिकांना शासकीय योजनांची माहिती द्यावी – मुख्य सचिव राजेश अग्रवाल**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या वाढदिवसानिमित्त १७ सप्टेंबर ते १७ ऑक्टोबर या कालावधीत राबविण्यात येणाऱ्या 'सेवा संकल्प अभियानातून' नागरिकांना विविध शासकीय योजनांचा माहिती देण्यासाठी या अभियानाची प्रभावी अंमलबजावणी करावी आणि सर्व विभागांनी समन्वयाने काम करावे.

बैठकीस महसूल विभागाचे अपर मुख्य सचिव विकास खारगे, ग्रामविकास विभागाचे सचिव चंद्रकांत पुलकुंडवार, आरोग्य विभागाचे प्रधान सचिव विनय विपुल, माहिती व जनसंपर्क विभागाचे प्रधान सचिव ब्रिजेश सिंहउपस्थित होते. विभागीय आयुक्त, जिल्हाधिकारी व जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी दूरदृश्य प्रणालीद्वारे सहभागी झाले होते.

# आष्टी मतदारसंघाच्या विकासाला नवी प्रशासकीय गती; कडा येथे अपर तहसील कार्यालय मंजूर

**आष्टी (प्रतिनिधी)**

आष्टी विधानसभा मतदारसंघातील नागरिकांना महसूल व प्रशासकीय सेवा अधिक सुलभ, गतिमान आणि त्यांच्या जवळच्या ठिकाणी उपलब्ध व्हाव्यात, यासाठी आ.सुरेश धस यांनी केलेल्या सातत्यपूर्ण पाठपुराव्याला यश आले आहे. कडा येथे अपर तहसील कार्यालय मंजूर करण्यात आले असून, त्यामुळे परिसरातील नागरिकांना महसूल व प्रशासकीय कामांसाठी आष्टी तहसील कार्यालयाच्या ठिकाणी वारंवार ये-जा करण्याची गरज कमी होणार आहे.

कडा व परिसरातील नागरिकांच्या दृष्टीने हा महत्त्वपूर्ण प्रशासकीय निर्णय मानला जात आहे. विविध महसूल विषयक कामे, दाखले, प्रशासकीय प्रक्रिया तसेच शासनाच्या विविध



योजनांशी संबंधित कामकाज अधिक सुलभ आणि जलदगतीने होण्यास या कार्यालयाची मदत होणार आहे. ग्रामीण भागातील नागरिकांना प्रशासन त्यांच्या अधिक जवळ उपलब्ध करून देण्याच्या दृष्टीने हा निर्णय महत्त्वाचा ठरणार आहे.

कडा येथे अपर तहसील कार्यालय मंजूर व्हावे, यासाठी आ. सुरेश धस यांनी शासन स्तरावर सातत्याने पाठपुरावा केला.याच पार्श्वभूमीवर मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथजी शिंदे, उपमुख्यमंत्री सुनेत्राताई अजितदादा पवार तसेच महसूल मंत्री चंद्रशेखरजी बावनकुळे यांचे आ.धस यांनी आभार मानले.

या निर्णयामुळे आष्टी मतदारसंघातील प्रशासकीय यंत्रणेला नवी गती मिळण्यासोबतच कडा परिसरातील नागरिकांना महसूल सेवा अधिक सुलभपणे उपलब्ध होणार आहेत.

"नागरिकांना शासकीय सेवा त्यांच्या जवळ आणि वेळेत मिळाव्यात, हा विकासाचा केंद्रबिंदू आहे. कडा येथे अपर तहसील कार्यालय मंजूर होणे हे त्याच दिशेने टाकलेले महत्त्वाचे पाऊल आहे," अशी भावना आ. सुरेश धस यांनी व्यक्त केली.

# लोकसेवार्थ : तरुणाईने घेतला पर्यावरण, ग्रामविकासाचा ध्यास



पिंपळगाव जलाल (ता. येवला, जि. नाशिक) येथील उपक्रमशील तरुणांचा गट गेल्या १६ वर्षांपासून सामाजिक उपक्रमांत सक्रिय आहेत. हे तरुण २०१९ पासून 'जय भवानी सामाजिक व सांस्कृतिक संस्थे'च्या माध्यमातून ग्रामविकासात कार्यरत आहेत. जनजागृती व लोकसहभागातून ग्रामीण भागातील विकास शक्य असल्याची संस्थेची भावना आहे. प्रयोगशील तरुण शेतकरी विजय दत्तू भोरकडे हे 'जय भवानी सामाजिक व सांस्कृतिक संस्थेचे अध्यक्ष आहेत. गेल्या १६ वर्षांपासून विविध सामाजिक उपक्रमांचे आयोजन ते करत आहेत. सुरुवातीला पर्यावरण या विषयावरील उपक्रम राबवून कामाची सुरवात झाली. त्यातूनच सायकल यात्रेचे आयोजन करण्यात आले होते. त्यातून अनेक तरुण कार्यकर्ते जोडले गेले. याच ताकदीवर संस्थेने राज्यभरात विधायक कामे यथाशक्ती करण्याचा संकल्प केला आहे. लोकसहभाग व त्यास जोड म्हणून श्रमदानाची जोड दिली आहे. कृषी, पर्यावरण, आरोग्य व जलसंधारण अशा प्रमुख विषयांवर 'जय भवानी सामाजिक व सांस्कृतिक संस्था' कार्य करत आहे. यामध्ये कुठलीही आर्थिक मदत न घेता सदस्यांच्या वर्गणीतून कामांसाठी ते खर्च करतात. देशी वृक्षसंपदा वाढीसाठी पुढाकार संस्थेची वाटचाल सुरू होण्याच्या अगोदरपासून कार्यकर्ते वृक्ष लागवडीसाठी आग्रही होते. दरम्यान, २०१७ पासून दुष्काळाच्या झळा सोसाव्या लागत होत्या. याचे प्रमुख कारण म्हणजे घटलेले पर्जन्यमान आणि वृक्षतोड हे होते. पर्यावरणाचा समतोल बिघडल्याने संस्थेने या विषयाकडे प्राधान्याने लक्ष वेधले. यासाठी राज्याच्या विविध ऐतिहासिक ठिकाणी सायकल यात्रेचे आयोजन करून जनजागृती करण्यास सुरुवात केली. यात्रेदरम्यान मार्गात ठिकठिकाणी रानमाळावर कमी पाण्यात तग धरणाऱ्या आणि सावली देणाऱ्या देशी वृक्षांची लागवड करण्यासाठी विशेष पुढाकार घेतला. यामध्ये वड, पिंपळ, कडुनिंब, पळस, आपटा, हिरडा, बेहडा, रेन ट्री, जांभूळ सीताफळ आदी विविध जंगली आणि औषधी वनस्पतीच्या बियांचे लाखो 'सीडबॉल' तयार करून जागोजागी मातीआड पुरून बीजारोपण केले आहे. यासह बियाण्यांचे वितरण पर्यावरणप्रेमी व विद्यार्थ्यांना करण्यात येत असते. 'माझे झाड- माझा सेल्फी' उपक्रम पावसाळ्यात संस्थेमार्फत 'माझे झाड - माझा सेल्फी' या उपक्रमांतर्गत प्रत्येकाकडून किमान एक झाड लावून त्यांचे संगोपन करण्यावर भर दिला जातो. वाढदिवस, लग्न, वर्षश्राद्ध, दशक्रिया विधी अशा प्रसंगी झाड लावून स्मृती चिरंतन ठेवण्यासाठी प्रयत्न करण्यात येत आहे. वृक्षारोपण करताना आंबा, सीताफळ, पेरू, नारळ, चिंच, चिकू, जांभूळ, आवळा, औदुंबर तसेच हिरडा, बेहडा, वड, पिंपळ, कडुनिंब, पापडा, भेंडी अशा जंगली आणि सावली देणाऱ्या झाडांची लागवड केली जाते. यासाठी विद्यार्थांना सहभागी करून घेत त्यांना रोपे वाटप करण्यात येते. या उपक्रमासाठी संस्थेला वन विभागाच्या अधिकाऱ्यांचे मार्गदर्शन मिळते. सायकल यात्रेतून सामाजिक जनजागृती दरवर्षी संस्थेतर्फे विविध ऐतिहासिक ठिकाणी सायकल यात्रेचे आयोजन केले जाते. यामध्ये सामाजिक, राजकीय, प्रशासन, कृषी अशा क्षेत्रातील अनेक जण सहभागी होतात. सायकल फेरीत विविध सामाजिक संदेश देणारे फलक लावून जनजागृती केली जाते. त्यामध्ये "बेटी बचाओ, बेटी पढाओ", "सायकल चालवा-देश वाचावा", "पाणी आडवा-पाणी जिरवा", "रक्तदान- सर्व श्रेष्ठ दान", 'वृक्षरोपण करा-वसुंधरा समृद्ध करा', यांसह कायदेविषयक जनजागृतीचे असे विविध संदेश दिले जातात. 'सायकल चालवा- देश वाचवा' हा चळवळीचा भाग असून वायू प्रदूषण कमी करण्यासह पेट्रोल बचत करण्यासाठी सदस्य जनजागृती करतात. कृषी विकासासाठी आग्रही ग्रामीण भागातील प्रत्येक तरुण शेतकरी हा केंद्रबिंदू मानून प्रयोगशीलता रुजविण्यासाठी संस्था नेहमी आग्रही असते. शेतीच्या माध्यमातून स्थानिक पातळीवर रोजगार निर्मितीवर भर देण्यात येत आहे. शेतीतील नवीन तंत्रज्ञान, पीकपद्धतीची माहिती होण्यासाठी संस्थेच्या वतीने तरुण शेतकऱ्यांना सोबत कृषी अभ्यास दौरा, कृषी प्रदर्शन भेटीचे आयोजन करण्यात येते. यामध्ये कांदा, भाजीपाला या पिकांवर प्रामुख्याने भर दिला जातो. गटशेतीला चालना देण्यासाठी शेतीमाल उत्पादन, विपणन या संबंधी विविध चर्चा समूहात घडवून आणल्या जातात. यामध्ये कृषितज्ज्ञ, अभ्यासक, प्रयोगशील शेतकरी व कृषी अधिकाऱ्यांचे मार्गदर्शन उपलब्ध करून दिले जाते.

# शून्यातून विश्व : कोकणातील सोनचाफ्याचा भारतभर दरवळ



मंद व सखोल दरवळणारा त्यामुळे सुवास, देवाच्या पूजेसह स्त्रियांच्या वेण्यामध्ये हक्काचे स्थान मिळवलेल्या सोनचाफ्याच्या प्रतीक कळंबटे फुलांना वाढती मागणी आहे. फुलांपासून मौल्यवान सुवासिक तेल, नैसर्गिक अत्तर निर्मिती, आयुर्वेदात औषध निर्मितीसाठी झाडाची साल व फुलांचा वापर होत असल्यामुळे 'सोनचाफा' कलमांना भारतभर मागणी आहे.नेमकी हीच गरज ओळखून रत्नागिरी तालुक्यातील नरबे येथील प्रतीक गंगाराम कळंबटे यांनी शेतीबरोबर नर्सरी व्यवसाय विकसित केला आहे. विशेष म्हणजे दरवर्षी ते लाखभर कलमे तयार करून विक्री करतात. त्यामुळे नरब्याच्या नर्सरीतील 'सोनचाफ्या'चा दरवळ भारतभर पसरला आहे, हे म्हटले तरी वावगे ठरणार नाही.

कळंबटे कुटुंबीय मूळ शेतकरी, वडिलोपार्जित शेती करत असताना प्रतीक यांच्या वडिलांनी आंबा, काजू बागायतीसह नर्सरी सुरू केली. त्यामुळे प्रतीक यांनाही लहानपणापासूनच शेतीची आवड निर्माण झाली. त्यामुळे त्यांनी उद्यानविद्या विषयात पदवी घेतली आहे.

शिक्षणानंतर मात्र त्यांनी वडिलांच्या पारंपरिक नर्सरीला शास्त्रोक्त पद्धतीची जोड देत आधुनिक रूप दिले आहे. प्रतीक यांच्या पत्नी माधुरी यांनाही शेतीची आवड व त्याच विषयात त्यांचेही शिक्षण असल्यामुळे त्यांना त्यांची समर्थ साथ मिळाली आहे.नर्सरीचे त्यांनी व्यवसायात परिवर्तन केले असून दरवर्षी ते आंबा, काजू, फणस, पेरू, चिकू, आवळा, लिंबू, जाम, स्टारफ्रूट, रायआवळा, दालचिनी, सोनचाफा, कवठी चाफा शोभिवंत झाडांची कलमे तयार करून विक्री करतात.

प्रतीक यांनी चार एकर क्षेत्रावर नर्सरी विकसित केली असून वर्षातून पाच वेळा ते कलमे बांधतात. त्यामुळे त्यांच्याकडे कायमस्वरूपी दहा जणांना रोजगार मिळाला आहे.सिझनच्या वेळी तर २५ ते ३० जण कामाला असतात. नर्सरी व्यवसायाबरोबर गावातील व परिसरातील शेतकऱ्यांना विविध पिकांसह सेंद्रिय खते, गोकृपाअमृत तयार करण्याचे प्रशिक्षण व कल्चर मोफत उपलब्ध करून देत आहेत.प्रतीक यांची बागायती शिवाय नर्सरीही आहे. स्वतःकडे असलेले ज्ञान ते इतरांनाही देत असतात. कातळावर त्यांनी हळद लागवड केली आहे. त्यासाठी गावातील शेतकऱ्यांसाठी त्यांनी प्रशिक्षण आयोजित केले होते.कातळ जमिनीवर पालापाचोळा, गवताचे आच्छादन टाकून मातीविरहित क्षेत्रावर लागवड करण्याचा प्रयोग प्रतीक यांच्यासह गावातील इतर शेतकऱ्यांनी केला आहे.प्रतीक यांच्या वडिलांनी लागवड केलेल्या आंबा, काजू क्षेत्राचा त्यांनी विस्तार वाढवला आहे. सध्या १५ एकर क्षेत्रावर आंबा तर १० एकर क्षेत्रावर काजू लागवड आहे. योग्य खत, पाणी व्यवस्थापन व मशागतीमुळे शेतमालाचा दर्जा उत्तम असून स्वतःच विक्री करत आहेत.

याशिवाय फणस, लिंब, आवळा लागवड मोठ्या प्रमाणावर केली आहे. विविध फुलझाडे, फळझाडांची नर्सरी विकसित केली आहे. शोभिवंत झाडे तयार करून ते विक्री करतात.त्यांच्या नर्सरीतील कापा, बिन चिकाचा कापा या फणसाच्या कलमांना वाढती मागणी आहे. अभ्यासपूर्ण संशोधनातून काही नवीन जाती विकसित केल्या आहेत. प्रतीक यांची गावात पहिली नर्सरी होती. त्यांच्याकडे सोनचाफा कलमे बांधण्यासाठी असलेल्या गावातील काही तरुणांनी कौशल्य आत्मसात करून स्वतःचा नर्सरी व्यवसाय थाटला आहे.

**संकलन –संयोजन : सुबोध रणशेवरे**

# ३३ वर्षांची परंपरा! मिरवणुकीऐवजी नवचैतन्य गणेश मंडळाचा भव्य महाप्रसाद

**परळी वैजनाथ** | परळी शहरातील हालगे गल्ली येथील नवचैतन्य गणेश मंडळाच्या वतीने गेल्या ३३ वर्षांपासून गणेशोत्सवात मिरवणूक न काढता विविध सामाजिक व धार्मिक उपक्रम राबविण्याची परंपरा यंदाही कायम ठेवण्यात आली आहे. यानिमित्त गुरुवार, दि. २४ सप्टेंबर रोजी सायंकाळी ७ ते १० वाजेपर्यंत भागवताचार्य श्री ह.भ.प. ज्ञानेश्वर महाराज उखळीकर यांचे भव्य कीर्तन आयोजित करण्यात आले आहे. श्रीधाम वृंदावन गौरक्षक सेना व सनातन रक्षक सेना फाउंडेशनचे मराठवाडा प्रदेशाध्यक्ष असलेले ज्ञानेश्वर महाराज उखळीकर यांच्या कीर्तनाचा लाभ भाविकांना घेता



येणार आहे. दरवर्षीप्रमाणे यंदाही शुक्रवार, दि. २५ सप्टेंबर रोजी भव्य-दिव्य महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे. दुपारी १ ते सायंकाळी ५ वाजेपर्यंत महाप्रसादाचे वितरण करण्यात येणार असून, दरवर्षी या महाप्रसादाचा सुमारे दहा हजार भाविक लाभ घेतात.

गणेशोत्सवात अनावश्यक खर्च व मिरवणुकीऐवजी गेल्या ३३ वर्षांपासून धार्मिक आणि सामाजिक उपक्रमांना प्राधान्य देणाऱ्या नवचैतन्य गणेश मंडळाच्या या उपक्रमाचे परिसरासह पंचक्रोशीत कौतुक होत आहे. विशेष म्हणजे हालगे गल्लीतील सर्व युवक एकत्र येऊन हा उपक्रम उत्साहाने राबवितात. कीर्तन व महाप्रसादाचा हजारो भाविकांनी लाभ घ्यावा, असे आवाहन नवचैतन्य गणेश मंडळ, हालगे गल्ली यांच्या वतीने करण्यात आले आहे.

# नाईक गणेश मित्र मंडळाच्या वतीने मोफत आरोग्य तपासणी व वृक्षारोपण उपक्रम उत्साहात संपन्न

**महागाव** | स्थानिक नाईक गणेश मित्र मंडळ, पिंपरी (ई) यांच्या वतीने सामाजिक बांधिलकी जपत मोफत आरोग्य तपासणी, रक्त तपासणी शिबिर आणि भव्य वृक्षारोपण उपक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. अध्यक्ष संदेश राठोड यांच्या नेतृत्वाखाली हे तिन्ही उपक्रम अत्यंत शिस्तबद्ध आणि यशस्वीरित्या पार पडले.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मंडळाचे अध्यक्ष चि. संदेश राठोड होते. कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून शिवसेना उपजिल्हाप्रमुख तथा जि. प. माजी सभापती डॉ. बी. एन. चव्हाण, डॉ. सरफराज सुरैय्या (MBBS, MD Belarus), शिवसेना तालुका प्रमुख व माजी नगरसेवक राजू राठोड (महागाव) आणि महागाव पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक (P.I.) सेवानंद वानखेडे यांची प्रमुख उपस्थिती लाभली होती.





या प्रसंगी गावचे सरपंच मधुकर कांबळे, पोलीस पाटील, शंकर हाडोळे, ग्रामसेवक गणेश टोनचर (ग्रामपंचायत पिंपरी (ई) व भांब) यांच्यासह रवींद्र पवार, प्रफुल पवार, आकाश राठोड, संजय राठोड, श्री. डुकरे सर,मेकेवार सर, मनोज चव्हाण, मनीष चव्हाण व समस्त महागाव पोलीस स्टेशनचे कर्मचारी उपस्थित होते.

आरोग्य शिबिरादरम्यान शेकडो ग्रामस्थांची मोफत आरोग्य व रक्त तपासणी करण्यात येऊन वैद्यकीय सल्ला देण्यात आला. यानंतर परिसराच्या पर्यावरणाचा समतोल राखण्यासाठी मान्यवरांच्या हस्ते वृक्षारोपण करण्यात आले. उपस्थित सर्व मान्यवरांनी नाईक गणेश मित्र मंडळाच्या या स्तुत्य व सामाजिक उपक्रमाचे विशेष कौतुक केले.

कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी मंडळाचे सर्व कार्यकर्ते व ग्रामस्थांनी विशेष परिश्रम घेतले. शेवटी सर्व डॉक्टर, पोलीस प्रशासन, उपस्थित मान्यवर व ग्रामस्थांचे नाईक गणेश मित्र मंडळाच्या वतीने मनःपूर्वक आभार मानण्यात आले.

दैनिक पत्रक प्रकाशक मालक संपादक श्री. नितीन सोपानराव ढाकणे मुद्रक विठ्ठल त्रिंबक साबळे मातोश्री ऑफसेट प्रिंटर्स, मोंढा, हैद्राबाद बँकेजवळ परळी वैजनाथ, जि. बीड पिन - 431515 येथे छापुन मुख्य कार्यालय दैनिक अतुल्य महाराष्ट्र, जलालपुर रोड परळी वै. ता. परळी वै.जि.बीड (महाराष्ट्र) पिन - 431515 येथे प्रकाशित केले आहे. संपादक नितीन सोपानराव ढाकणे, मो. 8446447777 (वाद : परळी न्यायलय अंतर्गत)

# सत्यशोधक समाज : समतेच्या सामाजिक क्रांतीची वाटचाल

२४ सप्टेंबर हा महाराष्ट्राच्या सामाजिक परिवर्तनाच्या इतिहासातील अत्यंत महत्त्वाचा दिवस आहे. याच दिवशी १८७३ मध्ये महात्मा ज्योतिराव फुले यांनी पुणे येथे सत्यशोधक समाजाची स्थापना केली. एकोणिसाव्या शतकातील भारतीय समाजव्यवस्थेत जातिभेद, अस्पृश्यता, स्त्रीदास्य, अज्ञान, धार्मिक कर्मकांड, सामाजिक विषमता आणि आर्थिक शोषण यांचे खोलवर रुजलेले स्वरूप पाहता सत्यशोधक समाजाची स्थापना ही केवळ एका संस्थेची निर्मिती नव्हती, तर प्रस्थापित सामाजिक व्यवस्थेला विचारांच्या पातळीवर दिलेले मूलभूत आव्हान होते. जन्माच्या आधारावर माणसामाणसांत श्रेष्ठ-कनिष्ठता निर्माण करणाऱ्या व्यवस्थेऐवजी मानवतेवर, समतेवर, विवेकावर आणि शिक्षणावर आधारित समाज निर्माण करण्याचा प्रयत्न या चळवळीमागे होता. महाराष्ट्राच्या सामाजिक इतिहासात सत्यशोधक समाजाने निर्माण केलेली वैचारिक परंपरा पुढील अनेक सामाजिक चळवळींना प्रेरणा देणारी ठरली. महाराष्ट्राच्या गॅझेटियरमध्येही सत्यशोधक समाजाच्या स्थापनेचा संबंध ज्योतिराव फुले यांच्याशी जोडला असून, या चळवळीने सामाजिक आणि धार्मिक क्षेत्रातील पुरोहितसत्तेच्या प्रभावाला आव्हान दिल्याचे नमूद केले आहे.

सत्यशोधक समाजाची स्थापना कोणत्या सामाजिक परिस्थितीत झाली हे समजून घेतल्याशिवाय या चळवळीचे ऐतिहासिक महत्त्व पूर्णपणे लक्षात येत नाही. त्या काळात समाजव्यवस्थेवर जन्माधिष्ठित जातिभेदाचा मोठा प्रभाव होता. शिक्षण, धार्मिक विधी, ज्ञानसंपादन आणि सामाजिक प्रतिष्ठा यांमध्ये मोठ्या प्रमाणात विषमता होती. बहुजन समाजातील अनेक घटक शिक्षणापासून दूर होते. स्त्रियांना शिक्षण घेण्याचा अधिकार प्रत्यक्षात उपलब्ध नव्हता. विधवांचे जीवन अत्यंत कठीण होते. बालविवाह, अस्पृश्यता आणि सामाजिक बहिष्कार यांसारख्या प्रथा समाजातील मोठ्या घटकांच्या जीवनावर परिणाम करीत होत्या. या परिस्थितीत केवळ धार्मिक सुधारणा पुरेशा नाहीत, तर समाजातील सत्तासंबंध, ज्ञानाचे नियंत्रण आणि सामाजिक प्रतिष्ठेचे निकष यांचाही पुनर्विचार झाला पाहिजे, असा विचार ज्योतिराव फुले यांच्या कार्यातून पुढे आला.

ज्योतिराव फुले यांचे सामाजिक विचार त्यांच्या स्वतःच्या अनुभवातून आणि तत्कालीन समाजाच्या निरीक्षणातून विकसित झाले. त्यांनी शिक्षणाला सामाजिक मुक्तीचे प्रभावी साधन मानले. सावित्रीबाई फुले यांच्या सहकार्याने त्यांनी मुलींच्या शिक्षणासाठी केलेले कार्य भारतीय सामाजिक परिवर्तनाच्या इतिहासात महत्त्वाचे आहे. १८४८ मध्ये पुण्यात मुलींसाठी शाळा सुरू करण्याच्या कार्यापासून त्यांच्या सामाजिक परिवर्तनाच्या प्रयत्नांना व्यापक दिशा मिळाली. पुढे वंचित आणि तथाकथित अस्पृश्य समाजातील मुला-मुलींसाठी शिक्षणाची दारे उघडण्याचा प्रयत्न करण्यात आला. सावित्रीबाई फुले यांनी शिक्षिका म्हणून या कार्यात सक्रिय सहभाग घेतला. त्यामुळे फुले दाम्पत्याचे कार्य हे केवळ स्त्रीशिक्षणापुरते मर्यादित नव्हते; ते शिक्षणाच्या माध्यमातून सामाजिक समतेची पायाभरणी करणारे व्यापक अभियान होते. उच्च शिक्षण किंवा ज्ञान काही मोजक्या घटकांची मक्तेदारी न राहता समाजातील सर्व घटकांना उपलब्ध झाले पाहिजे, हा या कार्याचा मूलभूत आशय होता.

सत्यशोधक समाजाच्या नावातच त्याच्या कार्याची दिशा दडलेली आहे. 'सत्याचा शोध घेणारा समाज' ही त्याची मूलभूत संकल्पना होती. परंपरेला केवळ परंपरा म्हणून स्वीकारण्याऐवजी तिची सामाजिक उपयुक्तता आणि मानवी परिणाम तपासले पाहिजेत, असा विवेकवादी दृष्टिकोन या चळवळीने पुढे आणला. व्यक्तीची प्रतिष्ठा तिच्या जन्मावर नव्हे, तर तिच्या माणूसपणावर आधारित असली पाहिजे, हा विचार सत्यशोधक समाजाच्या केंद्रस्थानी होता. त्यामुळे जात, जन्म, धार्मिक मध्यस्थी आणि सामाजिक दर्जा यांच्या आधारावर माणसाची किंमत ठरवण्याला या चळवळीने विरोध केला. सामाजिक समता ही केवळ धार्मिक किंवा नैतिक कल्पना नसून प्रत्यक्ष सामाजिक व्यवहाराचा आधार असली पाहिजे, अशी भूमिका या चळवळीच्या कार्यातून दिसून येते.

सत्यशोधक समाजाने धार्मिक कर्मकांडाच्या नावाखाली निर्माण झालेल्या सामाजिक विषमतेवरही प्रश्न उपस्थित केले. ज्योतिराव फुले यांच्या मते धार्मिक विधी आणि संस्कार यांवर काही विशिष्ट घटकांचे नियंत्रण राहिल्यामुळे सामान्य लोकांवर आर्थिक आणि सामाजिक अवलंबित्व निर्माण होत होते. त्यामुळे विवाहासारख्या सामाजिक विधींमध्ये पुरोहिताची अनिवार्यता नाकारण्याचा प्रयत्न सत्यशोधक समाजाने केला. साधेपणा, सामाजिक समता आणि अनावश्यक खर्चाला विरोध यांना महत्त्व देणारे सत्यशोधक विवाह पुढे चळवळीचे वैशिष्ट्य ठरले. अशा प्रकारे सामाजिक सुधारणेचा प्रश्न केवळ विचारांच्या पातळीवर न ठेवता दैनंदिन जीवनातील प्रथा आणि व्यवहारांशी जोडण्याचे काम या चळवळीने केले.

या चळवळीचा स्त्रीप्रश्नाकडे पाहण्याचा दृष्टिकोनही महत्त्वाचा होता. स्त्रीला शिक्षणापासून दूर ठेवणे, बालविवाह, विधवांवरील अन्याय आणि स्त्रीच्या स्वातंत्र्यावर असलेली बंधने यांना सामाजिक विषमतेचा भाग म्हणून पाहण्याची आवश्यकता फुले दाम्पत्याच्या कार्यातून स्पष्ट झाली. सावित्रीबाई फुले यांनी मुलींच्या शिक्षणासाठी आणि स्त्रियांच्या आत्मसन्मानासाठी केलेले कार्य सत्यशोधक विचारांच्या प्रत्यक्ष अंमलबजावणीचे उदाहरण आहे. स्त्रीशिक्षणाशिवाय समाजाची खरी प्रगती होऊ शकत नाही, कारण शिक्षणामुळे व्यक्तीमध्ये विचारशक्ती, आत्मविश्वास आणि अधिकारांची जाणीव निर्माण होते. त्यामुळे सत्यशोधक चळवळीचा स्त्री-मुक्तीच्या इतिहासाशी असलेला संबंध अत्यंत महत्त्वाचा आहे.

सत्यशोधक समाजाची भूमिका केवळ जातिभेदाविरोधापुरती मर्यादित नव्हती. शेतकरी आणि श्रमिकांच्या आर्थिक प्रश्नांकडेही ज्योतिराव फुले यांनी लक्ष वेधले. ग्रामीण समाजातील शेतकरी कर्जबाजारीपणा, महसूलव्यवस्था, सावकारी आणि मध्यस्थांच्या शोषणाला सामोरे जात असल्याचे त्यांनी मांडले. शेतकऱ्याचा आसूड या ग्रंथातून त्यांनी शेतकऱ्यांच्या प्रश्नांचे तीव्र सामाजिक आणि आर्थिक विश्लेषण केले. सामाजिक विषमता आणि आर्थिक शोषण यांचा परस्परसंबंध समजून घेणे आवश्यक आहे, ही जाणीव त्यांच्या विचारांत दिसते. महाराष्ट्राच्या गॅझेटियरमध्येही सत्यशोधक समाजाने शेतकरी, सावकार आणि गावपातळीवरील आर्थिक-सामाजिक संबंधांशी संबंधित प्रश्नांकडे लक्ष दिल्याचे नमूद केले आहे.

सत्यशोधक समाजाचा आणखी एक महत्त्वाचा पैलू म्हणजे त्याचा बहुजन समाजातील आत्मसन्मान जागवण्याचा प्रयत्न. सामाजिकदृष्ट्या कनिष्ठ मानल्या गेलेल्या समूहांनी स्वतःच्या जीवनाकडे कमीपणाच्या नजरेने पाहू नये, आपल्या अनुभवांना आणि श्रमांना प्रतिष्ठा मिळाली पाहिजे, शिक्षणाचा अधिकार मिळाला पाहिजे आणि सामाजिक निर्णयप्रक्रियेत आपला सहभाग असला पाहिजे, अशी जाणीव या चळवळीने निर्माण केली. त्यामुळे सत्यशोधक समाज ही केवळ सुधारक संस्था न राहता सामाजिक आत्मभान निर्माण करणारी चळवळ ठरली. समाजातील वंचित घटकांना स्वतःच्या प्रश्नांकडे स्वतंत्रपणे पाहण्याची आणि संघटितपणे मांडणी करण्याची प्रेरणा मिळाली.

ज्योतिराव फुले यांच्या विचारांत 'मानव' हा केंद्रबिंदू होता. त्यांनी 'निर्मिक' या संकल्पनेचा उल्लेख करताना सृष्टीच्या निर्मात्यापुढे सर्व मानव समान असल्याचा विचार मांडला. जन्माच्या आधारे निर्माण केलेली श्रेष्ठ-कनिष्ठता ही मानवी मूल्यांशी विसंगत आहे, असा त्यांचा आग्रह होता. महाराष्ट्राच्या गॅझेटियरमध्ये फुले यांच्या विचारांमध्ये मानवतावाद आणि सामाजिक समतेचा आग्रह असल्याचे नमूद केले आहे. तसेच सत्यशोधक समाजाची सदस्यता जातीनुसार बंदिस्त नव्हती; मूलभूत तत्त्वांवर विश्वास ठेवणाऱ्या व्यक्तींना त्यात स्थान मिळू शकत होते. त्यामुळे सत्यशोधक




समाजाचा संघर्ष विशिष्ट व्यक्ती किंवा समुदायाविरुद्ध नसून जन्माधारित विषमता आणि सामाजिक वर्चस्वाच्या विचारसरणीविरुद्ध होता, हे लक्षात घेणे आवश्यक आहे.

सत्यशोधक समाजाच्या विचारांचा पुढील काळातील सामाजिक परिवर्तनावर परिणाम झाला. विसाव्या शतकाच्या प्रारंभी राजर्षी शाहू महाराजांनी सामाजिक समता, शिक्षण आणि मागास घटकांच्या प्रतिनिधित्वासाठी केलेल्या कार्याला सत्यशोधक परंपरेशी वैचारिक जवळीक होती. महाराष्ट्राच्या सामाजिक इतिहासात सत्यशोधक विचारसरणीने पुढे बहुजन आणि ब्राह्मणेतर सामाजिक चळवळींना वैचारिक आधार दिला. महाराष्ट्र गॅझेटियरच्या नोंदीनुसार, ज्योतिराव फुले यांच्या निधनानंतर काही काळ चळवळीची गती कमी झाली; पुढे राजर्षी शाहू महाराजांच्या नेतृत्वामुळे आणि आश्रयामुळे सत्यशोधक चळवळीला नव्या टप्प्यात गतिमानता मिळाली.

सत्यशोधक परंपरेचा प्रभाव पुढे भारतीय सामाजिक न्यायाच्या व्यापक प्रवाहातही दिसतो. जातिभेद, अस्पृश्यता, सामाजिक प्रतिनिधित्व, शिक्षण आणि मानवी प्रतिष्ठा यांसारखे प्रश्न पुढील सामाजिक आणि राजकीय चळवळींच्या केंद्रस्थानी आले. समाजशास्त्रीय दृष्टीने पाहिले तर सत्यशोधक समाजाने 'सामाजिक स्तरीकरण' हा केवळ पारंपरिक सांस्कृतिक विषय नसून सत्ता, संसाधने, ज्ञान आणि प्रतिष्ठेच्या असमान वितरणाशी संबंधित प्रश्न आहे, हे अधोरेखित केले. म्हणूनच या चळवळीचे महत्त्व केवळ महाराष्ट्राच्या इतिहासापुरते मर्यादित राहत नाही. भारतीय सामाजिक परिवर्तनाच्या अभ्यासात तिचे स्थान महत्त्वाचे आहे. विद्यापीठ अनुदान आयोगाच्या ई-पीजी पाठ्यक्रमातील समाजशास्त्रीय अभ्याससामग्रीतही सत्यशोधक समाजाला भारतातील जातिविरोधी आणि अस्पृश्यताविरोधी सामाजिक चळवळींच्या संदर्भात महत्त्वाचे स्थान दिले आहे.

२४ सप्टेंबर २०२६ रोजी सत्यशोधक समाजाच्या स्थापनेला १५३ वर्षे पूर्ण होत असताना या चळवळीच्या विचारांकडे केवळ ऐतिहासिक स्मृती म्हणून पाहणे पुरेसे ठरणार नाही. आधुनिक भारताने संविधानाच्या माध्यमातून समता, स्वातंत्र्य, बंधुता आणि न्याय ही मूल्ये स्वीकारली आहेत. अस्पृश्यता कायद्याने रद्द झाली आहे, शिक्षणाचा विस्तार झाला आहे, महिलांसाठी आणि सामाजिकदृष्ट्या वंचित घटकांसाठी विविध संवैधानिक व कायदेशीर तरतुदी अस्तित्वात आहेत. तरीही सामाजिक पूर्वग्रह, जातीय भेदभाव, स्त्री-पुरुष विषमता, शैक्षणिक संधीतील तफावत, आर्थिक विषमता आणि सामाजिक बहिष्करण यांसारखी आव्हाने पूर्णपणे संपलेली नाहीत. अशा परिस्थितीत सत्यशोधक विचारांचा अर्थ वर्तमान सामाजिक वास्तवाचा विवेकाने शोध घेणे असा होतो.

आजच्या डिजिटल आणि माहितीप्रधान युगात 'सत्यशोधन' या संकल्पनेला आणखी एक नवा अर्थ प्राप्त झाला आहे. सामाजिक माध्यमांवर माहितीचा प्रचंड वेगाने प्रसार होत असताना अफवा, अपप्रचार, पूर्वग्रहदूषित माहिती आणि अर्धसत्ये यांपासून सत्य वेगळे करण्यासाठी चिकित्सक विचारशक्ती आवश्यक आहे. फुले यांनी शिक्षण आणि विवेकाला दिलेले महत्त्व आजच्या काळात म्हणूनच अधिक अर्थपूर्ण ठरते. शिक्षण म्हणजे केवळ पदवी मिळवणे नव्हे; तर प्रश्न विचारण्याची, पुराव्यांची चिकित्सा करण्याची, अन्याय ओळखण्याची आणि विवेकाधिष्ठित निर्णय घेण्याची क्षमता विकसित करणे होय. या अर्थाने सत्यशोधक समाजाचा वारसा आधुनिक ज्ञानसमाजासाठीही उपयुक्त आहे.

सत्यशोधक समाजाच्या स्थापनेचे स्मरण करताना फुले दाम्पत्याच्या कार्यातील परस्परपूरकता लक्षात घेणेही आवश्यक आहे. ज्योतिराव फुले यांनी सामाजिक विषमतेविरुद्ध वैचारिक आणि संघटनात्मक संघर्ष उभा केला, तर सावित्रीबाई फुले यांनी शिक्षण आणि स्त्री-मुक्तीच्या क्षेत्रात त्याला प्रत्यक्ष कृतीची जोड दिली. फातिमा शेख यांच्यासह अनेक सहकाऱ्यांनीही शिक्षणाच्या प्रसाराच्या कार्यात योगदान दिले. त्यामुळे सामाजिक परिवर्तन हे एका व्यक्तीचे कार्य नसून सामूहिक प्रयत्नांची प्रक्रिया असते, हा धडा सत्यशोधक परंपरेतून मिळतो.

सत्यशोधक समाजाच्या विचारांचा आणखी एक महत्त्वाचा संदेश म्हणजे सामाजिक परिवर्तनासाठी केवळ कायदे पुरेसे नसतात. कायद्याने समानता घोषित केली तरी सामाजिक मनोवृत्तीत बदल घडवून आणण्यासाठी शिक्षण, संवाद, संघटन आणि संवेदनशीलता आवश्यक असते. जातीय किंवा लैंगिक पूर्वग्रह केवळ कायद्याने नाहीसे होत नाहीत; ते दैनंदिन व्यवहार, भाषा, कुटुंब, शिक्षणसंस्था, रोजगार आणि सामाजिक संबंधांच्या पातळीवर बदलावे लागतात. म्हणूनच सत्यशोधक विचार आज सामाजिक समतेच्या व्यवहार्य कार्यक्रमाशी जोडण्याची गरज आहे.

आजच्या पिढीसमोर रोजगार, शिक्षण, तंत्रज्ञान, पर्यावरण, ग्रामीण विकास आणि सामाजिक न्याय अशी अनेक नवी आव्हाने आहेत. या सर्व प्रश्नांकडे पाहताना सामाजिक विषमतेचा विचार करणे आवश्यक आहे. कोणाला शिक्षणाची संधी मिळते, कोण डिजिटल साधनांपासून दूर राहतो, कोणाला रोजगाराच्या समान संधी मिळतात, ग्रामीण आणि शहरी भागातील सुविधांमध्ये किती तफावत आहे, महिलांना आणि वंचित घटकांना निर्णयप्रक्रियेत किती स्थान मिळते, यांसारखे प्रश्न विचारणे म्हणजेच आधुनिक अर्थाने सत्यशोधन होय. समाजातील प्रत्येक व्यक्तीच्या प्रतिष्ठेला समान महत्त्व देणारी विकासाची संकल्पना ही सत्यशोधक विचारांशी सुसंगत ठरते.

सत्यशोधक समाजाचा वर्धापनदिन हा त्यामुळे केवळ ज्योतिराव फुले यांच्या स्मरणाचा दिवस नाही; तो समाजाने स्वतःचे आत्मपरीक्षण करण्याचा दिवस आहे. आपल्या आजूबाजूला अजूनही कोणत्या स्वरूपाची विषमता आहे, कोणत्या समूहांना संधींपासून वंचित राहावे लागते, शिक्षण आणि ज्ञानाचा लाभ सर्वांपर्यंत पोहोचतो का, स्त्री-पुरुष समानतेची कल्पना प्रत्यक्ष जीवनात किती उतरली आहे आणि सामाजिक प्रतिष्ठेचे निकष अजूनही जन्म, जात किंवा आर्थिक स्थितीवर आधारित आहेत का, हे प्रश्न प्रत्येकाने विचारण्याची आवश्यकता आहे.

१८७३ मध्ये ज्योतिराव फुले यांनी सत्यशोधक



डॉ. राजेंद्र बगाटे,
(समाजशास्त्राचे अभ्यासक)

समाजाची स्थापना केली तेव्हा त्यांनी सामाजिक परिवर्तनासाठी सत्य, विवेक, शिक्षण आणि समतेचा मार्ग स्वीकारला. त्या काळातील परिस्थिती आणि आजचे सामाजिक वास्तव यांत मोठा फरक असला तरी मानवी प्रतिष्ठा, समानता आणि न्याय यांची आवश्यकता कायम आहे. म्हणून सत्यशोधक समाजाचा वारसा जपणे म्हणजे केवळ भूतकाळाचा गौरव करणे नव्हे, तर वर्तमानातील विषमता ओळखून तिच्यावर चिकित्सक विचार करणे आणि अधिक समताधिष्ठित समाजाच्या निर्मितीसाठी प्रयत्न करणे होय. सत्याचा शोध हा एखाद्या एका दिवसापुरता मर्यादित नसतो; तो सतत चालणारी सामाजिक आणि बौद्धिक प्रक्रिया आहे. २४ सप्टेंबरचा सत्यशोधक समाज वर्धापनदिन म्हणूनच प्रत्येकाला प्रश्न विचारण्याची, विवेक जागवण्याची आणि माणसामाणसांतील भेद कमी करून समतेचा समाज घडवण्याची प्रेरणा देणारा दिवस ठरतो. महात्मा ज्योतिराव फुले यांच्या सत्यशोधक विचारांचा खरा सन्मान त्यांच्या प्रतिमेला अभिवादन करण्यात नसून शिक्षण, समता, बंधुता, स्त्रीसन्मान आणि सामाजिक न्याय या मूल्यांना आपल्या दैनंदिन जीवनात प्रत्यक्ष स्थान देण्यात आहे.

# प्राध्यापक भरती पारदर्शक पद्धतीने झाली तर देव पावला म्हणायचं!

प्राध्यापक भरतीची प्रक्रिया सुरू झाली की अनेक पात्र उमेदवारांच्या मनात आशा निर्माण होते. वर्षानुवर्षे शिक्षण घेतले, पदव्युत्तर पदवी मिळवली, पात्रता परीक्षा उत्तीर्ण केली, संशोधन केले, पीएच. डी. मिळवली, शोधनिबंध प्रसिद्ध केले, अध्यापनाचा अनुभव घेतला आणि आता आपल्या ज्ञानाचा उपयोग विद्यार्थ्यांसाठी करण्याची संधी मिळेल, अशी अपेक्षा असते. परंतु भरती प्रक्रियेच्या शेवटी निवड कोणत्या आधारावर झाली, याचे समाधानकारक उत्तर मिळाले नाही तर या सर्व प्रयत्नांनंतरही उमेदवाराच्या मनात अस्वस्थता निर्माण होऊ शकते.

म्हणूनच प्राध्यापक भरतीच्या संदर्भात सर्वांत महत्त्वाचा शब्द आहे—पारदर्शकता.

पारदर्शकता म्हणजे केवळ जाहिरात प्रसिद्ध करणे किंवा मुलाखत घेणे नव्हे. भरतीची सुरुवात ज्या क्षणी होते, त्या क्षणापासून अंतिम निवड होईपर्यंत प्रत्येक टप्पा स्पष्ट, नियमबद्ध आणि विश्वासार्ह असणे आवश्यक आहे. कोणते पद रिक्त आहे, त्यासाठी कोणती पात्रता आवश्यक आहे, उमेदवारांचे मूल्यांकन कोणत्या निकषांवर होणार आहे, कोणत्या बाबींना किती महत्त्व आहे आणि अंतिम निवड कशी केली जाणार आहे, याची स्पष्ट कल्पना पात्र उमेदवारांना असली पाहिजे.

कारण प्राध्यापक भरतीमध्ये दोन पक्ष असतात. एक म्हणजे निवड करणारी संस्था आणि दुसरा म्हणजे संधीची अपेक्षा करणारा उमेदवार. संस्थेला योग्य व्यक्तीची निवड करायची असते, तर उमेदवाराला आपली गुणवत्ता योग्य पद्धतीने तपासली जावी, अशी अपेक्षा असते. या दोघांमध्ये विश्वासाचा पूल उभारण्याचे काम पारदर्शक प्रक्रिया करते.

आजच्या काळात उच्च शिक्षणाचे स्वरूप झपाट्याने बदलत आहे. विद्यार्थ्यांच्या अपेक्षा बदलल्या आहेत. पारंपरिक अध्यापनाबरोबर डिजिटल साधने, संशोधन, कौशल्याधारित शिक्षण, आंतरशाखीय दृष्टिकोन, नव्या शैक्षणिक धोरणाची अंमलबजावणी आणि रोजगाराभिमुख शिक्षण यांना महत्त्व आले आहे. त्यामुळे प्राध्यापकाची निवड करताना केवळ प्रमाणपत्रांची संख्या न पाहता त्याची शैक्षणिक तयारी, विषयातील आकलन, अध्यापनाची दृष्टी, संशोधनवृत्ती आणि विद्यार्थ्यांशी संवाद साधण्याची क्षमता यांचा विचार होणे आवश्यक आहे.

मात्र येथे एक महत्त्वाचा प्रश्न निर्माण होतो. गुणवत्ता मोजणार कोण आणि कशी?

हा प्रश्नच भरती प्रक्रियेच्या केंद्रस्थानी आहे.

एखाद्या उमेदवाराकडे चांगली शैक्षणिक पात्रता आहे म्हणून तो उत्तम शिक्षक असेलच असे नाही; त्याचप्रमाणे एखाद्या उमेदवाराला मुलाखतीत प्रभावीपणे बोलता आले नाही म्हणून त्याचे विषयज्ञान कमी आहे असेही ठरवता येत नाही. म्हणूनच मूल्यांकन करताना विविध पैलूंचा संतुलित विचार आवश्यक आहे.

मुलाखत हा भरती प्रक्रियेतील एक महत्त्वाचा भाग असू शकतो; परंतु मुलाखतीचे स्वरूप आणि मूल्यांकनाची पद्धत स्पष्ट असली पाहिजे. उमेदवाराला कोणत्या प्रकारचे प्रश्न विचारले जाणार, त्याच्या उत्तरांचे मूल्यांकन कसे केले जाणार, अध्यापनाची क्षमता कशी तपासली जाणार, विषयज्ञानाला किती महत्त्व दिले जाणार, याबाबत शक्य तितकी स्पष्टता असणे आवश्यक आहे.

पारदर्शकतेचा सर्वांत मोठा फायदा असा की ती निवड झालेल्या उमेदवारालाही संरक्षण देते.

जर एखाद्या उमेदवाराची निवड गुणवत्तेच्या स्पष्ट निकषांवर झाली असेल, तर त्याच्याकडे बोट दाखवण्याचे कारण उरत नाही. उलट, प्रक्रिया अस्पष्ट असेल तर निवड झालेल्या उमेदवारावरही अनावश्यक संशय निर्माण होऊ शकतो. त्यामुळे पारदर्शकता ही केवळ निवड न झालेल्या उमेदवारासाठी नसून निवड झालेल्या उमेदवाराच्या सन्मानासाठीही आवश्यक आहे.

निवड समितीची जबाबदारीही याच कारणामुळे मोठी आहे.



डॉ. सुवर्णा कराड, प्रदेशाध्यक्ष, वंजारी महासंघ, महिला आघाडी, महाराष्ट्र राज्य.

समितीतील सदस्यांनी उमेदवारांचे मूल्यांकन करताना पूर्वग्रह, वैयक्तिक ओळखी किंवा इतर कोणत्याही बाह्य घटकांपेक्षा पदाच्या आवश्यकतेला आणि उमेदवाराच्या गुणवत्तेला महत्त्व दिले पाहिजे. निर्णय घेताना प्रत्येक उमेदवाराकडे समान दृष्टीने पाहिले गेले पाहिजे.

भरती प्रक्रियेतील प्रत्येक टप्प्याची योग्य नोंद ठेवणेही आवश्यक आहे. आज तंत्रज्ञानामुळे हे सहज शक्य आहे. अर्जांची छाननी, पात्र उमेदवारांची यादी, मुलाखतीचे वेळापत्रक, गुणांकन, समितीच्या बैठकीतील नोंदी आणि अंतिम निर्णय यांचे व्यवस्थित दस्तऐवजीकरण करता येते. यामुळे भविष्यात प्रश्न उपस्थित झाल्यास प्रक्रियेची वस्तुनिष्ठ पडताळणी करता येते.

येथे आणखी एक गोष्ट महत्त्वाची आहे. पारदर्शकता म्हणजे प्रत्येक उमेदवाराला आपल्याला हवे ते उत्तर मिळणे नव्हे. एखाद्या उमेदवाराची निवड झाली नाही म्हणून प्रक्रिया अपारदर्शक ठरते असे नाही. त्याचप्रमाणे एखाद्याची निवड झाली म्हणून प्रक्रिया पारदर्शक होती असेही आपोआप सिद्ध होत नाही. पारदर्शकता ठरवायची असेल तर संपूर्ण प्रक्रियेचे नियम, निकष, गुणांकन आणि निर्णय यांचा वस्तुनिष्ठ विचार करावा लागतो.

उमेदवारांच्या दृष्टीनेही जबाबदारी आहे. भरती प्रक्रियेत सहभागी होणाऱ्या प्रत्येकाने आपली शैक्षणिक कागदपत्रे, अनुभव, संशोधन आणि इतर माहिती अचूकपणे सादर केली पाहिजे. पात्रता पूर्ण नसेल तर ती लपवण्याचा प्रयत्न करू नये. निवड प्रक्रियेवर प्रश्न असेल तर तोही पुराव्याच्या आधारे आणि योग्य मार्गाने उपस्थित केला पाहिजे.

कारण व्यवस्थेवर प्रश्न उपस्थित करणे हा अधिकार आहे; परंतु कोणावरही पुराव्याशिवाय आरोप करणे हा पारदर्शकतेचा मार्ग नाही.

प्राध्यापक भरतीमध्ये पारदर्शकता आली तर त्याचा परिणाम केवळ एका भरतीपुरता मर्यादित राहणार नाही. महाविद्यालयातील शैक्षणिक वातावरणावर त्याचा परिणाम होईल. योग्य शिक्षक विद्यार्थ्यांना मिळतील. विद्यार्थ्यांच्या शिक्षणाची गुणवत्ता वाढेल. संशोधनाला चालना मिळेल. संस्थेची शैक्षणिक विश्वासार्हता वाढेल. आणि सर्वांत महत्त्वाचे म्हणजे गुणवत्तेच्या जोरावर पुढे येऊ इच्छिणाऱ्या तरुण पिढीला व्यवस्थेवर विश्वास ठेवण्याचे कारण मिळेल.

आज अनेक तरुण उच्च शिक्षणासाठी मोठा वेळ आणि पैसा खर्च करतात. एका पदासाठी अनेक उमेदवार स्पर्धा करतात. त्यामुळे प्रत्येक उमेदवाराची अपेक्षा एकच असते—"माझी निवड करा" अशी नाही; तर "माझे योग्य आणि निष्पक्ष मूल्यांकन करा" अशी असते.

ही अपेक्षा पूर्ण करणे ही भरती व्यवस्थेची जबाबदारी आहे.

प्राध्यापक हा विद्यार्थ्यांच्या भवितव्याशी जोडलेला घटक आहे. त्यामुळे प्राध्यापक भरतीमध्ये तडजोडीला जागा नसावी. पद रिक्त आहे म्हणून कोणीतरी नियुक्त करणे हा उद्देश नसून, त्या पदासाठी योग्य व्यक्ती शोधणे हा उद्देश असला पाहिजे. आणि योग्य व्यक्ती शोधण्यासाठी प्रक्रिया विश्वासार्ह असली पाहिजे.

म्हणून प्राध्यापक भरतीसाठी काही साधी तत्त्वे स्वीकारता येतील—स्पष्ट जाहिरात, स्पष्ट पात्रता, समान निकष, वस्तुनिष्ठ मूल्यांकन, योग्य नोंद, जबाबदार निवड समिती आणि पडताळता येणारा अंतिम निर्णय.

हे सर्व झाले तर भरती प्रक्रियेबद्दल उमेदवारांच्या मनात प्रश्न कमी होतील. निवड झालेल्यांवर संशय राहणार नाही. संस्थेची विश्वासार्हता वाढेल आणि विद्यार्थ्यांना त्याचा थेट फायदा होईल.

शेवटी अपेक्षा फार मोठी नाही. ज्याची गुणवत्ता आहे त्याला योग्य संधी मिळावी. ज्याची निवड झाली नाही त्याला प्रक्रिया न्याय्य होती याचा विश्वास वाटावा. आणि ज्याची निवड झाली त्याला आपल्या गुणवत्तेच्या आधारे आपण निवडले गेलो, असे अभिमानाने सांगता यावे.

प्राध्यापक भरतीमध्ये एवढी पारदर्शकता आली, तर उच्च शिक्षण क्षेत्रातील अनेक प्रश्नांना उत्तर मिळू शकते.

आणि मगच मनापासून म्हणावेसे वाटेल—

"प्राध्यापक भरती पारदर्शक पद्धतीने झाली तर देव पावला म्हणायचं!"

दैनिक
# अतुल्य महाराष्ट्र
बीड, गुरुवार, 24 सप्टेंबर 2026

# क्रांतीज्योती सावित्रीमाई फुले महिला पतसंस्था महिलांचा आर्थिक स्तर उंचावण्यासाठी कटिबद्ध - अध्यक्ष सौ.सुनिता मोदी

## क्रांतीज्योती सावित्रीमाई फुले महिला नागरी सहकारी पतसंस्थेची ११ वी वार्षिक सर्वसाधारण सभा

**अंबाजोगाई (प्रतिनिधी)**





अंबाजोगाईसह पंचक्रोशीतील महिलांचा आर्थिक स्तर उंचाविण्याच्या विधायक उद्देशाने केवळ महिलांनी महिलांसाठी साधारणता १० वर्षांपूर्वी सुरू केलेल्या क्रांतीज्योती सावित्रीमाई फुले महिला नागरी सहकारी पतसंस्थेस ३१ मार्च २०२६ अखेर रूपये ३ लक्ष १२ हजार एवढा नफा झाल्याची माहिती पतसंस्थेच्या अध्यक्ष सौ.सुनीता राजकिशोर मोदी यांनी ११ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेत दिली.

क्रांतीज्योती सावित्रीमाई फुले महिला नागरी सहकारी पतसंस्थेच्या अध्यक्ष सौ.सुनीता राजकिशोर मोदी यांच्या अध्यक्षतेखाली ११ वी वार्षिक सर्वसाधारण सभा सहकार भवन, प्रशांत नगर, अंबाजोगाई येथे नुकतीच आयोजित करण्यात आली होती. सुरूवातीला दीपप्रज्ज्वलन आणि प्रतिमापूजनानंतर मान्यवरांचे स्वागत करण्यात आले. यावेळी १) मागील वार्षिक सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त वाचून कायम करणे, २) दिनांक ३१.०३.२०२६ अखेर अहवाल, तेरीजपत्रक, नफा तोटा व ताळेबंद पत्रकास मान्यता देणे, ३) दिनांक ३१.०३.२०२६ अखेरच्या नफा विभागणीस मंजुरी देणे, ४) आर्थिक वर्ष २०२५-२६ च्या लेखापरीक्षण अहवालाची नोंद घेणे व दोष दुरूस्तीस मान्यता देणे, ५) सन २०२६-२७ वर्षाच्या अंदाजपत्रकास मंजूरी देणे, ६) लेखापरीक्षकांच्या नियुक्तीस मान्यता देणे, ७) मा.अध्यक्ष यांच्या अनुमतीने ऐनवेळी येणाऱ्या इतर विषयांवर चर्चा करणे हे विषय सभेपुढे होते. अहवाल वर्षांत पतसंस्थेच्या एकूण १६ सभा झाल्या. त्या सर्व सभांमध्ये सभासदांचे हित लक्षात घेऊन व कामकाज करून निर्णय घेण्यात आले. पतसंस्थेच्या अध्यक्ष सौ.सुनीता मोदी यांनी ताळेबंद, नफातोटा, हिशोब पत्रक, अंदाजपत्रक व नफा विभागणी सभेसमोर ठेवताना सांगितले की, महिलांना काही प्रमाणात आर्थिक स्वायत्तता मिळवून देण्यासाठी व समाजातील महिलांचा आर्थिक स्तर उंचावून त्याचा फायदा कुटुंबाला व्हावा याच सकारात्मक हेतूने केवळ महिला भगिनींसाठी मागील अनेक वर्षांपासून सहकार क्षेत्रात कार्यरत असलेल्या राजकिशोर मोदी यांच्या मार्गदर्शनात क्रांतीज्योती सावित्रीमाई फुले महिला नागरी सहकारी पतसंस्था स्थापन करण्यात आल्याची माहिती पतसंस्थेच्या अध्यक्ष सौ.सुनीता राजकिशोर मोदी यांनी दिली. या पतसंस्थेच्या आर्थिक व्यवहार व विकासाच्या दृष्टीने पर्यायाने अंबाजोगाई शहरातील महिलांच्या आर्थिक उन्नतीसाठी संस्थेच्या सचिव शोभा बाबू खडकभावी, तसेच संचालिका डॉ.रूपाली सुधीर धर्मपात्रे, संगीता विष्णू सरवदे, उषा गणेश मसने, अंजली विष्णुपंत मस्के, सविता विजय रापतवार, सुरेखा बाबुराव खंडाळे, परवीन नुजहत फारोखी, जमुना जयप्रकाश चोकडा, सायली सुहास मोहिते आणि भागधारक, सभासद, ठेवीदार, खातेदार यांचे मोलाचे सहकार्य लाभत आहे. ३१ मार्च २०२६ अखेर पतसंस्थेच्या सभासदांची संख्या ही २३४१ एवढी आहे. तर भागभांडवल हे रूपये २६ लाख ४० हजार, एकूण ठेवी रूपये ०५ कोटी ५१ लाख २६ हजार एवढ्या आहेत. तर मार्च २०२६ अखेर पतसंस्थेने समाजातील उद्योजक महिलांना रूपये ०४ कोटी ०८ लाख ३८ हजार एवढे अर्थसहाय्य (कर्जवाटप) करून त्यांचा पर्यायाने त्यांच्या कुटुंबाचा आर्थिक स्तर उंचाविण्यासाठी प्रयत्न केला आहे. क्रांतीज्योती सावित्रीमाई फुले पतसंस्थेने अंबाजोगाई पिपल्स को-ऑप बँकेत ०२ कोटी ७४ लाख ४० हजार ६९५ रूपयांची गुंतवणूक देखील केली आहे. पतसंस्थेचा स्वनिधी हा रूपये ४३ लाख एवढा जमा असल्याची माहिती अध्यक्ष सौ.सुनीता मोदी म्हणाल्या. ३१ मार्च २०२६ अखेर पतसंस्थेस रूपये ०३ लाख १२ हजार एवढा नफा झाल्याचे सौ.सुनीता मोदी यांनी सांगत या यशाचे सर्वस्वी श्रेय हे पतसंस्थेचे मार्गदर्शक राजकिशोर मोदी यांच्यासह पतसंस्थेच्या भागधारक, सभासद, ठेवीदार, खातेदार, जामीनदार आणि महिलांनी घेतलेल्या कर्जाचा वेळेवर केलेला परतावा यालाच द्यावे लागेल असेही सौ.सुनीता मोदी म्हणाल्या. क्रांतीज्योती सावित्रीमाई फुले महिला पतसंस्था महिलांचा आर्थिक स्तर उंचावण्यासाठी कटिबद्ध असल्याचे सांगून त्यांनी आजमितीला संस्थेत एकूण ०३ कर्मचारी कार्यरत आहेत. यामध्ये शाखा व्यवस्थापक सागर संतोष कंगळे यांच्या समवेत लिपिक सचिन बालासाहेब काशीद, रोखपाल अनिल लिंबाजी काळे व शिपाई अंकुश माने हे कर्मचारी आहेत. तसेच ०१ नित्य निधी ठेव प्रतिनिधी सौ.सुषमा गोविंद खरटमोल यांचा देखील संस्थेच्या यशस्वी वाटचालीत मोलाचा वाटा असल्याचे पतसंस्थेच्या अध्यक्ष सौ.सुनीता राजकिशोर मोदी यांनी यावेळी बोलताना सांगितले. पतसंस्थेची वार्षिक सर्वसाधारण सभा अत्यंत खेळीमेळीच्या वातावरणात संपन्न झाली. यावेळी पतसंस्थेच्या भागधारक, सभासद महिला भगिनी उपस्थित होत्या.

# गेवराई पोलिसांची अवैध धंद्यांवर मोठी कारवाई: ७ हातभट्टी दारू व १ जुगार अड्ड्यावर धाड

## ४ लाख १८ हजारांचा मुद्देमाल जप्त

**बीड (विशेष प्रतिनिधी)**



बीड जिल्ह्याचे पोलीस अधीक्षक श्री. नवनीत काँवत यांच्या आदेशानुसार अवैध धंद्यांविरुद्ध मोहीम तीव्र करत गेवराई पोलीस ठाण्याच्या पथकाने धडक कारवाई केली आहे. गोपनीय माहितीच्या आधारे टाकलेल्या छाप्यात ७ गावठी हातभट्टी दारूचे अड्डे आणि १ जुगार अड्डा उद्ध्वस्त करत पोलिसांनी एकूण ४ लाख १८ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे.

### ■ हातभट्टी दारूच्या ७ ठिकाणांवर धाडी

गेवराई पोलिसांनी मिळालेल्या गुप्त माहितीवरून तुकानाईक तांडा, आंबूनाईक तांडा आणि हरिलाल नाईक तांडा येथील विविध ७ ठिकाणी एकाच वेळी छापे मारले. या कारवाईत हातभट्टी दारू तयार करण्यासाठी लागणारे रसायन आणि इतर साहित्य असा एकूण ९६,३०० रुपयांचा मुद्देमाल जप्त करून जागेवरच नष्ट करण्यात आला. या प्रकरणी ४ महिलांसह ११ जणांविरुद्ध गुन्हे नोंदवण्यात आले आहेत.

गुन्हे दाखल झालेले आरोपी यामध्ये पापा जनार्धन चव्हाण, संकेत वसंत राठोड, बाबू हाचु राठोड, संजय श्रीराम जाधव, विकास संजय जाधव, रामदास एकनाथ पवार, विठ्ठल हिरालाल राठोड आणि इतर ४ महिला.

### ■ ताकडगाव येथे जुगार अड्ड्यावर धाड

दुसऱ्या कारवाईत ताकडगाव येथे पत्ते खेळत असलेल्या जुगार अड्ड्यावर पोलिसांनी रात्रीच्या वेळी अचानक छापा टाकला. या ठिकाणाहून पोलिसांनी ४ जणांना ताब्यात घेतले असून त्यांच्याकडून मोटारसायकल आणि रोख रक्कम असा एकूण ३ लाख २१ हजार ७०० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. दत्ता काशिनाथ जंगले, मोहन प्रकाश गव्हाणे, श्रीहरी अभिमान यादव आणि तानाजी लक्ष्मण जगदाळे (सर्व रा. ताकडगाव, ता. गेवराई). यांना ताब्यात घेतले आहे.

ही संपूर्ण धडक कारवाई पोलीस अधीक्षक नवनीत काँवत, अपर पोलीस अधीक्षक समीर शेख, उपविभागीय पोलीस अधिकारी अनिल कटके यांच्या मार्गदर्शनाखाली गेवराईचे पोलीस निरीक्षक किशोर पवार, पोउपनि अमोल शिंगणे, तसेच पोलीस अंमलदार नितीन नवले, महेंद्र ओव्हाळ, विनोद कुटे, शिवकन्या निगुळे, रेणुका बहिरवाळ, कांता शेळके, योगेश धुमाळ, जितेंद्र ओव्हाळ, गोरक्ष डोके, संदीप कांबळे, महादेव कदम आणि राजेंद्र सांगळे यांच्या पथकाने पार पाडली. प्रकरणाचा पुढील तपास पोकॉ/२११२ जितेंद्र ओव्हाळ करत आहेत.



# स्मार्ट कंपनी मार्फत स्वारातीत झालेली भरती प्रक्रिया रद्द करा - राज्य संपर्कप्रमुख मनोज कदम

## स्वाभिमान संघटनेचे उपजिल्हाधिकारी, स्वारातीच्या अधिष्ठातांना निवेदन

**अंबाजोगाई प्रतिनिधी**

येथील स्वामी रामानंद तीर्थ ग्रामीण शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रूग्णालय, अंबाजोगाई येथे स्मार्ट कंपनी मार्फत करण्यात येणाऱ्या नोकरभरती प्रक्रियेवर आक्षेप घेत स्वाभिमान संघटना महाराष्ट्र राज्याचे संपर्कप्रमुख मनोज कदम यांच्या नेतृत्वाखाली उपजिल्हाधिकारी व स्वारातीच्या अधिष्ठातांना निवेदन देण्यात आले.

या भरतीसाठी अंबाजोगाई परिसरातील अनेक महिला, विद्यार्थी व युवकांनी अर्ज केले होते. मात्र, भरती प्रक्रियेदरम्यान अचानक काही उमेदवारांची निवड यादी जाहीर करण्यात आल्याने इतर अर्जदारांमध्ये तीव्र नाराजी निर्माण झाली आहे. जाहीर करण्यात आलेली निवड यादी व संपूर्ण भरती प्रक्रिया पारदर्शक नसल्याचा आरोप स्वाभिमान संघटनेच्या वतीने करण्यात आला असून, सदर भरती प्रक्रिया रद्द करून नव्याने पारदर्शक पद्धतीने भरती करण्यात यावी, अशी मागणी करण्यात आली आहे. स्वाभिमान संघटना महाराष्ट्र राज्याचे संपर्कप्रमुख मनोज कदम यांच्या नेतृत्वाखाली प्रशांत चव्हाण, किशोर लोमटे, अजय सरवदे, विवेक सोळंके, रघु सुरवसे, धनंजय कावळे, डी.एम.जाधव, परवेज पटेल, बंटी देशमुख, सुमित लोमटे यांच्यासह मोठ्या संख्येने सर्व मित्र परिवार यांनी एकत्र येत उपजिल्हाधिकारी अंबाजोगाई यांची भेट घेऊन सदरील बाब त्यांच्या निदर्शनास आणून दिली. त्यांच्याशी चर्चा केली. निवेदन दिले. तसेच स्वामी रामानंद तीर्थ ग्रामीण शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रूग्णालयाच्या अधिष्ठातांची भेट घेऊन सदरील बाब त्यांच्या निदर्शनास आणून दिली. मनोज कदम व शिष्टमंडळाने त्यांच्याशी तपशीलवार चर्चा केली. निवेदन दिले. भरती प्रक्रियेतील निवड निकष, अर्जदारांची गुणवत्ता, निवड यादी तयार करण्याची पद्धत तसेच संबंधित कंपनीची भूमिका याबाबत सखोल चौकशी करण्याची मागणी यावेळी करण्यात आली. यावेळी निवेदनकर्त्यांनी आर्थिकदृष्ट्या वंचित असलेल्या सुशिक्षित बेरोजगार युवकांना रोजगाराच्या संधींपासून दूर ठेवले जात असल्याची भावना व्यक्त केली. दरम्यान, निवड प्रक्रिया प्रत्यक्षात बोगस असल्याचा आरोप करण्यात आला असला तरी, त्याबाबत अधिकृत चौकशीचा निष्कर्ष अथवा संबंधित प्रशासनाची भूमिका अद्याप समोर आलेली नाही. त्यामुळे या प्रकरणाची निष्पक्ष चौकशी करून वस्तुस्थिती स्पष्ट करावी, अशी मागणी निवेदनकर्त्यांनी केली आहे. पारदर्शक भरती, सर्व अर्जदारांना समान संधी आणि निवड प्रक्रियेची चौकशी या प्रमुख मागण्यांसाठी देण्यात आलेल्या या निवेदनामुळे अंबाजोगाईतील संबंधित नोकरभरतीचा मुद्दा पुन्हा एकदा चर्चेत आला आहे. स्वाभिमान संघटना ही विधायक, सामाजिक व अन्यायाविरूद्ध लढणारी स्वाभिमानी संघटना असून ती श्री.नितेश नारायनराव राणे (संस्थापक अध्यक्ष) यांच्या नेतृत्वाखाली काम करते. स्वाभिमान संघटना महाराष्ट्र राज्याचे संपर्कप्रमुख मनोज कदम यांनी दिलेल्या निवेदनात नमूद करण्यात आले आहे की, आशिया खंडातील सर्वात लोकप्रिय व अंबाजोगाईचे भूषण अशी आपली एस.आर.टी.आर ची ओळख आहे. येथे दररोज दोन हजार रूग्ण उपचारांसाठी येत असतात. आपल्या अशा भूषण असलेल्या दवाखान्यात या स्मार्ट सर्विसेस, पुणे या कंपनीला कंत्राट दिले असून या कंपनीमार्फत निवड केलेली उमेदवार हे आकस्मत निवड असून या निवड प्रक्रियेमध्ये गोरगरीब पात्र उमेदवाराचा समावेश नसून ही निवड प्रक्रिया तात्काळ रद्द करावी. स्वाभिमान संघटना तर्फे प्रमुख मागण्या अशा : १) भरती प्रक्रियेची स्वतंत्र व निष्पक्ष चौकशी करावी., २) भरतीचे निकष व निवड प्रक्रिया सार्वजनिक करणे., ३) नियमबाह्य प्रकार आढळल्यास संबंधित आरोग्य कारवाई करणे., ४) चौकशी पूर्ण होईपर्यंत भरती लास्ट किती देण्यात यावी., ५) या भरती मध्ये कोविड-१९ कार्यकाळात जीवाची बाजी लावून कार्य केलेल्या पुढील योजना सामील करावी ही मागणी. ही भरती प्रक्रिया रद्द करावी असे म्हटले आहे. सदरील निवेदनाच्या प्रतिलिपी माहितीस्तव १) सन्माननीय मुख्यमंत्री, २) ना.सुनेत्राताई पवार, उपमुख्यमंत्री तथा पालकमंत्री, बीड जिल्हा., ३) खा.बजरंग सोनवणे, ४) वैद्यकीय शिक्षण मंत्री, ५) सचिव वैद्यकिय शिक्षण, ६) आयुक्त वैद्यकिय शिक्षण, ७) संचालक साहेब, वैद्यकीय शिक्षण व अन्न प्रशासन विभाग, ८) जिल्हाधिकारी, बीड, ९) उपजिल्हाधिकारी, अंबाजोगाई., १०) उपवैद्यकिय अधिक्षक, रूग्णालय विभाग, स्वा. रा.ती प्रा.शा.वै.म, अबाजोगाई. यांना देण्यात आलेल्या आहेत अशी माहिती स्वाभिमान संघटना महाराष्ट्र राज्याचे संपर्कप्रमुख मनोज कदम यांनी दिली आहे.

# मुरुड येथे अप्पर तहसील कार्यालय मंजूर; भाजप नेते आ. कराड यांच्या प्रयत्नांना यश



**लातूर** | लातूर ग्रामीण विधानसभा मतदार संघातील सर्वात मोठ्या असलेल्या मुरुड येथे अप्पर तहसील कार्यालय कार्यान्वित करण्याचा राज्यातील महायुती शासनाने निर्णय घेतला असून भाजपाचे नेते आ. रमेशआप्पा कराड यांच्या प्रयत्नाला अखेर यश आले आहे. मुरुड तालुका निर्मितीची ही पहिली पायरी आहे.

लातूर तालुक्यात मुरुड हे सर्वात मोठे शहर असून मुरुडला तालुक्याचा दर्जा मिळावा अशी अनेक वर्षापासून मुरुड आणि परिसरातील नागरिकांची मागणी होती. लातूर ग्रामीणचे आमदार श्री. रमेशआप्पा कराड यांनी विधानसभा निवडणुकीत मुरुडला तालुक्याचा दर्जा मिळवून देऊ असे आश्वासन दिले होते. त्यानुसार मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस आणि राज्याचे महसूल मंत्री चंद्रशेखरजी बावनकुळे साहेब यांच्याकडे आ. कराड यांनी मुरुडला तालुक्याचा दर्जा मिळावा यासाठी वेळोवेळी प्रयत्न केले.

आ. कराड यांच्या प्रयत्नाला यश आले असून राज्याच्या महसूल विभागाच्या वतीने लातूर तालुक्यातील मुरुड येथे अप्पर तहसील कार्यालय कार्यान्वित करण्याचा अध्यादेश २२ सप्टेंबर २०२६ रोजीच्या शासन निर्णया परिपत्रकानुसार घेण्यात आला आहे. लातूर तहसील कार्यालयाचे दोन भागात विभागणी करण्यात आली असून त्यानुसार नव्याने कार्यान्वित होत असलेल्या मुरुड अप्पर तहसील अंतर्गत मुरुड, चिंचोली ब. आणि तांदूळजा या महसूल मंडळाचा समावेश करण्यात आला आहे तर लातूर तहसील कार्यालय अंतर्गत उर्वरित लातूर, कन्हेरी, हरंगुळ बु., गातेगाव, बाभळगाव आणि कासारखेडा ही महसूल मंडळे ठेवण्यात आली आहेत.

मुरुड शहराचा वाढता विस्तार लक्षात घेता मुरुड शहराला नगरपरिषदेचा दर्जा देण्याबाबत आणि लहान-मोठ्या उद्योजकासाठी आणि सुशिक्षित बेरोजगाराकरिता मुरुड येथे एमआयडीसी कार्यान्वित व्हावी, नवीन सुसज्ज विश्रामगृह यासाठी राज्यातील महायुती शासनाच्या माध्यमातून कारवाई सुरू असून लवकरच मंजूरी मिळणार असल्याची माहिती देऊन भाजपाचे नेते आ. रमेशआप्पा कराड यांनी मुरुड येथे अप्पर तहसील कार्यालय कार्यान्वित होणे ही बाब मुरुड तालुका निर्मितीची पहिली पायरी असून शासनाच्या या निर्णयामुळे मुरुड आणि त्या परिसरातील नागरिकांची मोठी सोय होणार आहे.

मुरुडला अप्पर तहसील कार्यालय मंजूर केल्याबद्दल राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस साहेब, उपमुख्यमंत्री एकनाथजी शिंदे, उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार, राज्याचे महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे आणि जिल्ह्याचे पालकमंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले यांचे लातूर ग्रामीण विधानसभा मतदारसंघाचे आमदार श्री. रमेशआप्पा कराड यांनी आभार व्यक्त केले आहेत.